
# भुलाबाईची गाणी



डॉ. सौ. वीरा मांडवकर

# सौ. वीरा मांडवकर

**यांचे सदाबहार संग्राह्य साहित्य**

गृहिणींसाठी टॉप टिप्स, मंजुळवाणे उखाणे, भुलाबाईची गाणी, स्वप्नफुले (कथासंग्रह), ओंजळ (प्राति. काव्यसंग्रह सहसंपादन), गंधाली (प्राति. चारोळीसंग्रह सहसंपादन)

# डॉ. पवन मांडवकर

**यांचे सदाबहार संग्राह्य साहित्य**

❖ कादंबऱ्या - डेड लॉक, विरह, दीपशिखा, अपूर्ण संघर्ष, मी अनामिका बोलतेय ❖ कथासंग्रह - ब्यांडमास्तर, दामूअण्णा ❖ बालकथा - गाढव गोष्टी, झंपू, संस्कारशील श्याम, गौरीची दिवाळी ❖ काव्यसंग्रह - प्रेम कविता, ओंजळ (प्राति.), गंधाली (प्राति.), किलबिलाट (साहित्य संस्कृती मंडळ अनुदानित) ❖ संकीर्ण - धमाल वार्ता, वास्तुशास्त्रातील ठळक संकेत, एका रखेलीची (आत्म)हत्या, छान छान नावे बाळांची, अण्णा हजारेंचे राळेगणसिद्धी, शनिशिंगणापूर, हसणावळ ❖ अभ्यासात्मक - झटपट शुद्धलेखन, झटपट पत्रलेखन, झटपट मराठी शुद्धलेखन, झटपट निबंध, ठळक शुद्धलेखन, बहिणाईची गाणी : सौंदर्य आणि समीक्षा, अर्वाचीन मराठी कविता १८८५ ते १९३५ : एक दृष्टिक्षेप, महाविद्यालयीन कार्यप्रणाली

किमान शंभर प्रती रोखीने घेणाऱ्या वितरकांना हवी तितकी प्रचंड सवलत*, एक्स्चेंज सुविधा (*अटी लागू)

**सौ. वीरा मांडवकर, सेवा प्रकाशन,** स्वामिनी अपार्टमेंट, बब्बी पहेलवान चौक, टिळकवाडी, यवतमाळ ☎ (०७२३२) २५२९७५, ९४२२८६७६५८ 🗁 **सेवा प्रकाशन ग्रंथ वितरण,** विजय कॉलनी, रुक्मिणी नगर, अमरावती ☎ (०७२१) २६७७८५३




लोकगीतांचा मौलिक संग्रह

# भुलाबाईची गाणी


## प्रा.डॉ.सौ. वीरा मांडवकर



*वक्रतुंड एंटरप्रायजेस*

सुतारमाळ, जिव्हाळा कॉलनी

कोल्हापूर ४१६ ०१०

भ्रमणध्वनी : ९८९०६३०८४९

ISBN 978-81-925695-2-9

- भुलाबाईची गाणी
  (Bhulabaichi Gani)
- © डॉ. वीरा मांडवकर
  मराठी विभाग, इंदिरा महाविद्यालय,
  कळंब, जि. यवतमाळ
- नवीन आवृत्ती ३ नोव्हेंबर २०२२
- प्रती १०००
- प्रकाशक
  वक्रतुंड एंटरप्रायजेस
  सौ. अपर्णा अनिल मोहिते
  सुतारमाळ, जिव्हाळा कॉलनी
  कोल्हापूर ४१६ ०१०
  भ्रमणध्वनी : ९८९०६३०८४९
- मुद्रक
  दमयंती एजन्सी, कोल्हापूर

- मुखपृष्ठ
  भरत यादव
  कोल्हापूर

- मूल्य ९५ रुपये

पाखरे घुमती बुरजावरी ।
गुंजावाणी डोयाच्या सारवल्या टीका ।
आमच्या गावच्या भुलोजी नायका ।
एवी निघा तेवी निघा
कांडा तीळ बाई तांदूळ घ्या ।
आमच्या आया तुमच्या आया
खातील काय दुर्धोंडे ।
दुर्धोंड्याची लागली टिळी
आयुष्य दे बा वनमाळी ।
माळी गेला शेताभाता
पाऊस पडला येताजाता ।
पड पड पावसा थेंबो थेंबी
थेंबो थेंबीच्या ओव्या लोंबी ।
आळव्या तुझी सात कणसं
भोंडल्या तुझी सोळा वर्षं ।
आतुला मातुला, चरणी धातुला ।
चरणीचे सोंडे, हातपाय गोंडे ।
एक एक नांगर विसाचा
साडे नांगर निसायचा ।
नेसा ग नेसा बाहुल्यांनो
वरीस वर्षं पावल्यांनो ।
♬ ♬ ♬

खिडकीत होते वरण
भुलोजीला लेक झाला
गावोगाव तोरण ।।
अडकीत जाऊ खिडकीत जाऊ
खिडकीत पाय घसरला
भुलोजीला लेक झाला
साखरपेढा विसरला ।।

♬ ♬ ♬

## २८. खिरापत

बाणा बाई बाणा, परदेशी बाणा ।
गाणे संपले खिरापत आणा ।।
आणावी आणावी शंकराने आणावी ।
वाटावी वाटावी पार्वतीने वाटावी ।।

♬ ♬ ♬

## २९. ऐलमा पैलमा गणेश देवा

ऐलमा पैलमा गणेश देवा ।
माझा खेळ मांडू दे, करीन तुझी सेवा ।
माझा खेळ मांडिला वेशीच्या दारी ।



# भुलाबाईची गाणी गुणगुणण्यापूर्वी ....

'बाणा बाई बाणा, परदेशी बाणा ।
गाणे संपले खिरापत आणा ।।
आणावी आणावी शंकराने आणावी ।
वाटावी वाटावी पार्वतीने वाटावी ।।'

असा समारोप करून एकमेकींना खाऊ वाटण्याचा कार्यक्रम होतो आणि भुलाबाईच्या गाण्यांना पूर्णविराम मिळतो. पिढ्यानूपिढ्या चालत आलेल्या सांस्कृतिक वारशाचे एक प्रतीक म्हणजे 'भुलाबाईची गाणी'. लोकवाङ्मयातील या गाण्यांची निर्मिती कोणी केली, केव्हा केली हे अज्ञात असले तरी त्यामधून स्त्रीमनाचे विविध पैलू नजरेस पडतात हे निश्चित. पूर्वीच्या काळी कुमारिकांना, सासुरवाशिणींना घराबाहेर पडण्याचे फारसे स्वातंत्र्य नव्हते. घराच्या चार भिंतीतच स्त्रियांचे आयुष्य व्यतीत व्हायचे. अशावेळी त्यांच्या आयुष्यातला विरंगुळा म्हणजे चारचौघींनी एकत्र येऊन सणवार साजरे करणे होय. यासाठीच मंगळागौर, आषाढीसारखे सण साजरे करण्याच्या प्रथा निर्माण झाल्या. साहजिकच या प्रसंगी म्हटली जाणारी गाणी स्त्रीविश्वाशी संबंधित असतात. स्त्रियांचे दैनंदिन जीवनातील अनुभव, माहेराविषयीची ओढ, अभिमान, सासरी असलेली दुःखे, पतीवरील

प्रेम, सासू, नणंद, जावा, दीर यांचे वर्णन, दागदागिने अशा विषयांनी ही गाणी गुंफलेली दिसतात.

तीस-पस्तीस वर्षांपूर्वी भुलाबाईची गाणी भाद्रपद पौर्णिमेपासून आश्विन पौर्णिमेपर्यंत महिनाभर रोज संध्याकाळी घरोघरी म्हटली जायची. मनोरंजनाची साधने वाढल्याने आणि धकाधकीमुळे आजच्या काळात हा सण तीन दिवसांवर आलेला दिसतो, तर काही ठिकाणी केवळ आश्विन पौर्णिमेलाच एक दिवस भुलाबाईची गाणी म्हटली जातात.

भुलाबाईची गाणी म्हणण्याची प्रथा शहरात हळूहळू कमी होत गेलेली असली तरी काही भागात आजही हौशीने ही गाणी म्हटली जातात. मात्र कालमानानुसार त्यात काही बदल झालेले आहेत. जसे गाण्यात काही ठिकाणी येणाऱ्या गोट, पाटल्या, तोडे अशा काही जुन्या दागिन्यांऐवजी नेकलेस, हार, ब्रेसलेट असे नवीन दागिन्यांचे उल्लेख येतात. कधी नवरीला सिल्कची साडी आणण्याचे आमीष दाखविले जाते. कधी ‘डॉक्टर’सारखे इंग्रजी शब्दही डोकावतात. असे काही बदल सोडले, तरी स्त्रीमनाची सनातन जडणघडण अजूनही तशीच असल्यामुळे भुलाबाईच्या गाण्यांतील सासर व माहेरबद्दलच्या भावनांमध्ये बदल झालेला नाही. म्हणूनच रुसवे, फुगवे, राग, लोभ, प्रेम, असुया, आनंद, दुःख अशा विविध भावच्छटांनी युक्त अशी ही भुलाबाईची गाणी स्त्रियांच्या मनात कायम घर करून राहतात.



नाव ठेवा अलेक्झांडर ।।
अडकीत जाऊ खिडकीत जाऊ
खिडकीत होत्या पिना
भुलोजीला लेक झाली
नाव ठेवा मीना ।।
अडकीत जाऊ खिडकीत जाऊ
खिडकीत होती बशी
भुलोजीला लेक झाला
नाव ठेवा शशी ।।
अडकीत जाऊ खिडकीत जाऊ
खिडकीत होता हिरा
भुलोजीला लेक झाली
नाव ठेवा मीरा ।।
अडकीत जाऊ खिडकीत जाऊ
खिडकीत होती आरती
भुलोजीला लेक झाली
नाव ठेवा भारती ।।
अडकीत जाऊ खिडकीत जाऊ
खिडकीत होते करवंद
भुलोजीला लेक झाला
नाव ठेवा अरविंद ।।
अडकीत जाऊ खिडकीत जाऊ

खिडकीत होता बत्ता
भुलोजीला लेक झाला
नाव ठेवा दत्ता ।।
अडकीत जाऊ खिडकीत जाऊ
खिडकीत होती माती
भुलोजीला लेक झाली
नाव ठेवा स्वाती ।।
अडकीत जाऊ खिडकीत जाऊ
खिडकीत होती मूर्ती
भुलोजीला लेक झाली
नाव ठेवा कीर्ती ।।
अडकीत जाऊ खिडकीत जाऊ
खिडकीत होता साबू
भुलोजीला लेक झाला
नाव ठेवा बाबू ।।
अडकीत जाऊ खिडकीत जाऊ
खिडकीत होत्या कपबशा
भुलोजीला लेक झाली
नाव ठेवा अश्लेषा ।।
अडकीत जाऊ खिडकीत जाऊ
खिडकीत होते कॅलेंडर
भुलोजीला लेक झाला



भुलाबाईच्या गाण्यांप्रमाणेच या पुस्तकात माहेरी आलेल्या सासुरवाशिणींच्या मनाला विरंगुळा देणारी आणि विविध प्रसंगी म्हटली जाणारी काही गाणीही समाविष्ट केलेली आहेत.

लोकवाङ्मय हे खऱ्या अर्थाने मौखिक वाङ्मय असतं. पिढ्यानूपिढ्या चालत आलेला तो संस्कृतीचा ठेवा असतो. त्यामुळे शब्दरचना, कडव्यांचा अनुक्रम यांत पुष्कळदा फरक पडत जातो. शिवाय विविध प्रांतांत भुलाबाईची गाणी म्हणण्याची पद्धत व विविध रचना यांमुळे सर्वत्र सारखेपणाची अपेक्षा करता येत नाही. हे संकलन करताना मला काही रचनांमध्ये तृटी किंवा शब्दरचनांमध्ये काही भाग चुकीचा वाटल्याने सुधारणा करून मी हे पुस्तक सादर केले आहे. मात्र काही रचना संदर्भहीन वाटतात. स्थलकालपरत्वे होणाऱ्या बदलांव्यतिरिक्त या पुस्तकात काही चुका अथवा उणिवा आढळल्यास, वाङ्मयाचा ठेवा जतन करणाऱ्या अभ्यासकांनी अवश्य कळवावे.

— वीरा मांडवकर

# भुलाबाईची गाणी

## अनुक्रमणिका


भुलाबाईची गाणी गुणगुणण्यापूर्वी.... ३
अनुक्रमणिका ६

भुलाबाईची गाणी

१. पहिली पूजा ७
२. आमच्या अंगणी ७
३. शिंक्यातलं लोणी ८
४. काळा कोळसा ९
५. एवढुशी गंगा १०
६. आपे दूध तापे १२
७. नदीच्या काठी राळा १४
८. यादवराया १५
९. अक्कण माती १८
१०. कारल्याचं बी १८
११. झिपरं कुत्रं २२
१२. चांदण्या रात्री २४
१३. तुझ्या गं माहेरच्यांनी २६
१४. आड्यावरच्या पाड्यावर २७
१५. हत्तीच्या सोंडेवर २८
१६. अतरंडीवर पतरंडी २८
१७. पापड भाजिला २९
१८. येथून दाणा ३०
१९. खण खण कुदळी ३१
२०. श्रीकृष्णा कमलाकांता ३२
२१. चंदनाच्या झाडावरून ३३
२२. या या भुलाबाई ३४
२३. लव लव भेंड्या ३६
२४. एक लिंबू झेलू ३६
२५. डोहाळे ३८
२६. साखरेच्या गोण्या ४२
२७. बारसे ४३
२८. खिरापत ४६
२९. ऐलमा पैलमा ४६




सुंठीच्या गोण्या बाई लोटविल्या अंगणी
भुलाबाई बाळंतीण आठवा दिवस ।।८।।
डिंकाच्या गोण्या बाई लोटविल्या अंगणी
भुलाबाई बाळंतीण नववा दिवस ।। ९।।
अहळीवाच्या गोण्या बाई लोटविल्या अंगणी
भुलाबाई बाळंतीण दहावा दिवस ।।१०।।
तापविले हंडे बाई मागच्या अंगणी
भुलाबाई बाळंतीण अकरावा दिवस ।।११।।
बाराव्या दिवशी बारसे केले
भुलोजीरावाचे नाव ठेवले ।।१२।।

♬ ♬ ♬

## २७. बारसे

हळकुंड बाळा, हळकुंड बाळा
सोनियाचे वाळे
आमची भुलाबाई काय काय करते?
नानापरीच्या चोळ्या शिवते
चोळ्या शिवुनी सासरी जाते
सासरच्या वाटे कुचू कुचू काटे
माहेरच्या वाटे हळदकुंकू दाटे
अडकीत जाऊ खिडकीत जाऊ

खोली सारवून सावध राही
जो जो रे जो जो, जो जो रे हरी, श्रीकृष्ण जन्मला यशोदे घरी
यशोदा साखर वाटते दारी, आनंद झाला नंदाच्या घरी
जो जो रे जो जो, जो जो रे हरी ।। ९।।

♫ ♫ ♫

## २६. साखरेच्या गोण्या

साखरेच्या गोण्या बाई लोटविल्या अंगणी
भुलाबाई बाळंतीण पहिला दिवस ।।१।।
काजूच्या गोण्या बाई लोटविल्या अंगणी
भुलाबाई बाळंतीण दुसरा दिवस ।।२।।
खारकेच्या गोण्या बाई लोटविल्या अंगणी
भुलाबाई बाळंतीण तिसरा दिवस ।।३।।
तिळाच्या गोण्या बाई लोटविल्या अंगणी
भुलाबाई बाळंतीण चौथा दिवस ।।४।।
बदामाच्या गोण्या बाई लोटविल्या अंगणी
भुलाबाई बाळंतीण पाचवा दिवस ।।५।।
गुळाच्या गोण्या बाई लोटविल्या अंगणी
भुलाबाई बाळंतीण सहावा दिवस ।।६।।
खोबऱ्याच्या गोण्या बाई लोटविल्या अंगणी
भुलाबाई बाळंतीण सातवा दिवस ।।७।।





## १. पहिली पूजा



पहिली गं पूजा बाई, देवादेवा सादे ।
साथीला मंडोबा, खेळी खेळी खंडोबा ।
खंडोबाच्या दारी बाई, वर्ष वर्ष आवसणी ।
आवसणीचे पाणी जसे, गंगेचे पाणी ।
गंगेच्या पाण्याने, वेळीला भात ।
जेवीला कंथ, राणा भुलाबाईचा ।
ठोकीला राळा, हनुमंत बाळा ।
हनुमंत बाळाचे, लांब लांब झोके ।
हातपाय गोरे, टिकाऊ डोळे ।
बाजुबंद टेकती, माता पान झळकती ।
झळकतीचं एकच पान, दुरून भुलाबाई नमस्कार ।

♫ ♫ ♫

## २. आमच्या अंगणी

आमच्या अंगणी भेंडीचं झाड, भेंडीचं झाड
भेंड्या झुळझूळ हलतील गं, हलतील गं

भुलाबाईचे मामा येतील गं, येतील गं
भुलाबाईचे मामा व्यापारी, व्यापारी
तोंडात चिकणी सुपारी, सुपारी
सुपारी काही फुटेना, फुटेना
मामा काही उठेना, उठेना
सुपारी गेली फुटून, फुटून
मामा गेले उठून, उठून.

♫ ♫ ♫

## ३. शिंक्यातलं लोणी

शिंक्यातलं लोणी खाल्लं कोणी
ते खाल्लं वहिनीनी, वहिनीनी
आता माझा दादा येईल गं, येईल गं
दादाच्या मांडीवर बशीन गं, बशीन गं
दादा तुझी बायको चोरटी, चोरटी
असू दे माझी चोरटी, चोरटी
घे काठी, लाग पाठी
घेत नाही काठी, लागत नाही पाठी
घरादाराची लक्ष्मी मोठी, घरादाराची लक्ष्मी मोठी.

♫ ♫ ♫



माझे की डोहाळे पुरवावे भाऊ
बाजारी जाऊनी आणावा खाऊ
आणतील दीरभावा, म्हणतील नणदाजावा
तिचे डोहाळे तिला भारी, नेऊन टाका पलंगावरी
पलंगाचा हलका दोर, तसा तिचा पती थोर, अंगणी नाचे मोर
जो जो रे जो जो, जो जो रे हरी, कृष्णाचा पाळणा यशोदे घरी
यशोदा साखर वाटते दारी, आनंद झाला नंदाच्या घरी
जो जो रे जो जो, जो जो रे हरी ।।७।।
आठवे मासी बाप की पुसे
पोरी पोरी तुझे डोहाळे कसे?
माझे की डोहाळे पुरवावे बाबा
सरी बिंदल्या घडवाया टाका
आणतील दीरभावा, म्हणतील नणदाजावा
तिचे डोहाळे तिला भारी, नेऊन टाका पलंगावरी
पलंगाचा हलका दोर, तसा तिचा पती थोर, अंगणी नाचे मोर
जो जो रे जो जो, जो जो रे हरी, कृष्णाचा पाळणा यशोदे घरी
यशोदा साखर वाटते दारी, आनंद झाला नंदाच्या घरी
जो जो रे जो जो, जो जो रे हरी ।।८।।
नववे मासी आई की पुसे
लेकी लेकी तुझे डोहाळे कसे?
माझे की डोहाळे पुरवावे आई

वहिनी वहिनी डोहाळे कसे?
माझे की डोहाळे पुरवावे वन्स
बाजारी जाऊनी आणावी कणसं
आणतील दीरभावा, म्हणतील नणदाजावा
तिचे डोहाळे तिला भारी, नेऊन टाका पलंगावरी
पलंगाचा हलका दोर, तसा तिचा पती थोर, अंगणी नाचे मोर
जो जो रे जो जो, जो जो रे हरी, कृष्णाचा पाळणा यशोदे घरी
यशोदा साखर वाटते दारी, आनंद झाला नंदाच्या घरी
जो जो रे जो जो, जो जो रे हरी ।।५।।
सहावे मासी बहीण की पुसे
ताई ताई तुझे डोहाळे कसे?
माझे की डोहाळे पुरवावे बहिणी
बाजारी जाऊनी आणावी वेणी
आणतील दीरभावा, म्हणतील नणदाजावा
तिचे डोहाळे तिला भारी, नेऊन टाका पलंगावरी
पलंगाचा हलका दोर, तसा तिचा पती थोर, अंगणी नाचे मोर
जो जो रे जो जो, जो जो रे हरी, कृष्णाचा पाळणा यशोदे घरी
यशोदा साखर वाटते दारी, आनंद झाला नंदाच्या घरी
जो जो रे जो जो, जो जो रे हरी ।।६।।
सातवे मासी भाऊ की पुसे
ताई ताई तुझे डोहाळे कसे?



# ४. काळा कोळसा

काळा कोळसा
झुकझुक वाणा
पालखीत बसला
भुलोजी राणा
भुलोजी राणाने
काय काय केले
एक पान दरबारी
दुसरं पान शेजारी
शेजाऱ्याचा डामा-डुमा
वाजतो तसा वाजू द्या
आम्हाला खेळ मांडू द्या
खेळात सापडली अधेली
अधेली देऊ वाण्याला
वाण्या वाण्या शोपा दे
शोपा माझ्या गाईला
गाई गाई दूध दे
दूध माझ्या बगळयाला
बगळ्या बगळ्या पंख दे
पंख देऊ राजाला
राजा राजा घोडे दे

घोडे माझ्या बापाला
बापा, बापा भातुकली दे
भातुकली माझ्या भावाला
भावा, भावा गोंडे दे
गोंडे माझ्या ताईला
तेच गोंडे लेऊ
सासरी जाऊ
सासरच्या वाटे
कुचूकुचू काटे
माहेरच्या वाटे
हळदकुंकू दाटे.

♬ ♬ ♬

## ५. एवढुशी गंगा

एवढुशी गंगा झुळझुळ वाहे
तांब्या पितळी झळकत जाए
तांब्या पितळी नायको
हिरवी टोपी बायको
हिरवी टोपी हरपली
सरपाआड लपली



तिसरे मासी दीर की पुसे
वहिनी, वहिनी डोहाळे कसे?
माझे की डोहाळे पुरवावे दिरा
बाजारी जाऊनी आणावा शिरा
आणतील दीरभावा, म्हणतील नणदाजावा
तिचे डोहाळे तिला भारी, नेऊन टाका पलंगावरी
पलंगाचा हलका दोर, तसा तिचा पती थोर, अंगणी नाचे मोर
जो जो रे जो जो, जो जो रे हरी, कृष्णाचा पाळणा यशोदे घरी
यशोदा साखर वाटते दारी, आनंद झाला नंदाच्या घरी
जो जो रे जो जो, जो जो रे हरी ।।३।।
चवथे मासी जाऊ की पुसे
जाऊबाई जाऊबाई डोहाळे कसे?
माझे की डोहाळे पुरवावे जावा
बाजारी जाऊनी आणावा खवा
आणतील दीरभावा, म्हणतील नणदाजावा
तिचे डोहाळे तिला भारी, नेऊन टाका पलंगावरी
पलंगाचा हलका दोर, तसा तिचा पती थोर, अंगणी नाचे मोर
जो जो रे जो जो, जो जो रे हरी, कृष्णाचा पाळणा यशोदे घरी
यशोदा साखर वाटते दारी, आनंद झाला नंदाच्या घरी
जो जो रे जो जो, जो जो रे हरी ।।४।।
पाचवे मासी नणंद की पुसे

# २५. डोहाळे

पहिले मासी सासू की पुसे
सुनबाई सुनबाई डोहाळे कसे?
माझे की डोहाळे पुरवावे सासू
बाजारी जाऊनी आणावे काजू
आणतील दीरभावा, म्हणतील नणदाजावा
तिचे डोहाळे तिला भारी, नेऊन टाका पलंगावरी
पलंगाचा हलका दोर, तसा तिचा पती थोर, अंगणी नाचे मोर
जो जो रे जो जो, जो जो रे हरी, कृष्णाचा पाळणा यशोदे घरी
यशोदा साखर वाटते दारी, आनंद झाला नंदाच्या घरी
जो जो रे जो जो, जो जो रे हरी ।।१।।
दुसरे मासी सासरा की पुसे
सुनबाई सुनबाई डोहाळे कसे?
माझे की डोहाळे पुरवावे सासऱ्या
बाजारी जाऊनी आणाव्या साखऱ्या
आणतील दीरभावा, म्हणतील नणदाजावा
तिचे डोहाळे तिला भारी, नेऊन टाका पलंगावरी
पलंगाचा हलका दोर, तसा तिचा पती थोर, अंगणी नाचे मोर
जो जो रे जो जो, जो जो रे हरी, कृष्णाचा पाळणा यशोदे घरी
यशोदा साखर वाटते दारी, आनंद झाला नंदाच्या घरी
जो जो रे जो जो, जो जो रे हरी ।।२।।



सरपदादा एकला
जाई आंबा पिकला
जाई नाही जुई नाही
चिंचेखालची राणुबाई
चिंचा वेचत जाय गं
पाच पानं खाय गं
खाता खाता रंगली
तींयात घागर बुडाली
तींया तींया ठाकुरा
भुलाबाई जाते माहेरा
जाते तशी जाऊ द्या
तांब्याभर पाण्याने न्हाऊ द्या
बोटभर मेण लावू द्या
बोटभर कुंकू लावू द्या
तांबड्या घोड्यावर बसू द्या
तांबड्या घोड्याचे उलटे पाय
आऊल पाऊल नागपूर गाव
नागपूर गावचे ठासे ठुसे
दुरून भुलाबाईचे माहेर दिसे.

# ६. आपे दूध तापे

आपे दूध तापे, त्यावर पिवळी साय
नदीच्या अल्याड, नदीच्या पल्याड
दामाजी सोनार, त्याने घडविला साखळ्यांचा जोड
घ्या घ्या भुलाबाई, साखींयांचा जोड
कशी घेऊ दादा, घरी नणदा जावा
घरी नणदा जावा, करतील माझा हेवा
हेवा परोपरी, नणदा घरोघरी
नणदेचा बैल, डुलत येईल
सोन्याचं कारलं, फेकत जाईल
गडावर गड छत्तीस गड, तिथला सोनार कारागिर
त्याने घडविला, साखींयांचा जोड
साखींयांचा जोड, घेत नाही
तुमच्या बरोबर, येत नाही
कशी येऊ दादा, घरी.... फेकत जाईल
गडावर गड छत्तीस गड तिथला सोनार कारागिर
त्याने घडविला, जोडव्यांचा जोड
घ्या घ्या भुलाबाई, जोडव्यांचा जोड
जोडव्यांचा जोड, घेत नाही
तुमच्या बरोबर, येत नाही
कशी येऊ दादा घरी.... फेकत जाईल



पाचा लिंबाचा पाळणा, माळ घाली हनुमंता
हनुमंताची निळी घोडी, येताजाता कमळं तोडी
कमळाच्या पाठीमागे लागली राणी
अगं अगं राणी, इथे कुठे पाणी?
पाणी आहे यमुनाजमुना
यमुनाजमुनेची बारीक वाळू
तेथे खेळे चिलिया बाळू
चिलिया बाळाला भूक लागली
सोन्याच्या शिंपीनी दूध पाजलं
नीज रे नीज रे तान्ह्या बाळा
मी तर जाते सोनारवाडा
सोनारवाड्याचे दिवे जळे
लेकराची हासळी गळे
हासळी वाटे रवे रवे
रव्याचे पान रंगीत गेले
एक गेला खारिका, एक गेला खोबरा
खारीक खोबऱ्याचं आलं, जिऱ्यामिऱ्याचं गेलं
पिठी बाई पिठी, दारोदार चिठ्ठी
भुलोजीला लेक झाली, नाव ठेवा विठी.

♫ ♫ ♫

बसल्या मोरावर सांडले मिरे
भुलोजी हिरे घरी नाही, घरी नाही.
♫ ♫ ♫

## २३. लव लव भेंड्या

लव लव भेंड्या लवतील गं, लवतील गं
फुल फुल साड्या आणतील गं, आणतील गं
फुल फुल साड्या दरबारी, दरबारी
आमचा मामा व्यापारी, व्यापारी
मामाच्या तोंडी सुपारी, सुपारी
सुपारी गेली गडगडत, गडगडत
मामा बसले बडबडत, बडबडत
♫ ♫ ♫

## २४. एक लिंबू झेलू बाई

एक लिंबू झेलू बाई, दोन लिंबं झेलू
तीन लिंबं झेलू बाई, चार लिंबं झेलू
चार लिंबं झेलू बाई, पाच लिंबं झेलू



गडावर गड छत्तीस गड, तिथला सोनार कारागिर
त्याने घडविला, तोरड्यांचा जोड
घ्या घ्या भुलाबाई, तोरड्यांचा जोड
तोरड्यांचा जोड, घेत नाही
तुमच्या बरोबर, येत नाही
कशी येऊ दादा घरी.... फेकत जाईल
गडावर गड छत्तीस गड, तिथला सोनार कारागिर
त्याने घडविला कुड्यांचा जोड
घ्या घ्या भुलाबाई, कुड्यांचा जोड
कुड्यांचा जोड, घेत नाही
तुमच्या बरोबर, येत नाही
कशी येऊ दादा घरी.... फेकत जाईल
गडावर गड छत्तीस गड तिथला सोनार कारागिर
त्याने घडविला, बांगड्यांचा जोड
घ्या घ्या भुलाबाई, बांगड्यांचा जोड
बांगड्यांचा जोड, घेत नाही
तुमच्या बरोबर, येत नाही
कशी येऊ दादा घरी.... फेकत जाईल
गडावर गड छत्तीस गड, तिथला सोनार कारागिर
त्याने घडविला, तोड्यांचा जोड
घ्या घ्या भुलाबाई, तोड्यांचा जोड

तोड्यांचा जोड, घेत नाही
तुमच्या बरोबर, येत नाही
कशी येऊ दादा घरी.... फेकत जाईल.
♬ ♬ ♬

## ७. नदीच्या काठी राळा

नदीच्या काठी राळा पेरला बाई, राळा पेरला
एके दिवशी काऊ आला बाई, काऊ आला
एकच कणीस तोडून नेलं बाई, तोडून नेलं
सईच्या अंगणात टाकून दिलं बाई, टाकून दिलं
सईने उचलून घरात नेलं बाई, घरात नेलं
कांडूनकुंडून राळा केला बाई, राळा केला
राळा घेऊन बाजारला गेली बाई, बाजारला गेली
पाच पैशाची घागर आणली बाई, घागर आणली
घागर घेऊन पाण्याला गेली बाई, पाण्याला गेली
मधल्या बोटाला विंचू चावला बाई, विंचू चावला
आला गं सासरचा वैद्य
डोक्यात टोपी फाटकीतुटकी
अंगात सदरा फाटकातुटका
नेसायला धोतर विटकंकिटकं



पिवळ्या चोळीवर बसला मोर, बसला मोर
बसल्या मोरावर सांडले दाणे, सांडले दाणे
भुलोजी राणे घरी नाही, घरी नाही
या या भुलाबाई आमच्या आळी, तुमच्या आळी
तुमच्या अंगात हिरवी चोळी
हिरव्या चोळीवर बसला मोर, बसला मोर
बसल्या मोरावर सांडले जोंधळे, सांडले जोंधळे
भुलोजी गोंधळे घरी नाही, घरी नाही
या या भुलाबाई आमच्या आळी, तुमच्या आळी
तुमच्या अंगात लाल चोळी
लाल चोळीवर बसला मोर, बसला मोर
बसल्या मोरावर सांडली फुले, सांडली फुले
भुलोजी घुले घरी नाही, घरी नाही
या या भुलाबाई आमच्या आळी, तुमच्या आळी
तुमच्या अंगात जांभळी चोळी
जांभळ्या चोळीवर बसला मोर, बसला मोर
बसल्या मोरावर सांडले आंबे, सांडले आंबे
भुलोजी तांबे घरी नाही, घरी नाही
या या भुलाबाई आमच्या आळी, तुमच्या आळी
तुमच्या अंगात निळी चोळी
निळ्या चोळीवर बसला मोर, बसला मोर

मेणबत्ती लावून घडवा गं, घडवा गं
मेणबत्ती गेली विझून, विझून
सोनार गेला निजून, निजून ।।३।।
चंदनाच्या झाडावरून पडली गं, पडली गं
मंगळसुत्र माझे मोडले गं, मोडले गं
नागपूरच्या सोनाराला बोलवा गं, बोलवा गं
पणती लावून घडवा गं, घडवा गं
पणती गेली विझून, विझून
सोनार गेला निजून, निजून ।।४।।
♫ ♫ ♫

## २२. या या भुलाबाई

या या भुलाबाई आमच्या आळी, तुमच्या आळी
तुमच्या अंगात गुलाबी चोळी
गुलाबी चोळीवर बसला मोर, बसला मोर
बसल्या मोरावर सांडलं अत्तर, सांडलं अत्तर
भुलोजी डॉक्टर घरी नाही, घरी नाही
या या भुलाबाई आमच्या आळी, तुमच्या आळी
तुमच्या अंगात पिवळी चोळी



पायात जोडे फाटकेतुटके
हातात काठी जळकं लाकूड
कपाळाला गंध मातीचं
तोंडात विडा शेणाचा
कसा गं दिसतो भिकाऱ्यावाणी बाई, भिकाऱ्यावाणी
आला गं माहेरचा वैद्य
डोक्याला टोपी जरीकाठी
अंगात सदरा मखमली
नेसायला धोतर रेशीमकाठी
पायातला जोडा पुणेशाही
हातात काठी पचरंगी
कपाळाला गंध चंदनाचं
तोंडात विडा केशराचा
कसा गं दिसतो राजावाणी बाई, राजावाणी.
♫ ♫ ♫

## ८. यादवराया

यादवराया, राणी रुसून बैसली कैसी
सासुरवासी सून घरासी येईना कैसी
सासू गेली समजावयाला

चला चला सुनबाई, आपुल्या घराला
पाटल्यांचा जोड देते तुम्हाला
पाटल्यांचा जोड नको मला
मी नाही यायची तुमच्या घराला
यादवराया राणी ......
सासरा गेला समजावयाला
चला चला सुनबाई आपुल्या घराला
कुड्यांचा जोड देतो तुम्हाला
कुड्यांचा जोड नको मला
मी नाही यायची तुमच्या घराला
यादवराया राणी ......
भासरा गेला समजावयाला
चला चला सुनबाई आपुल्या घराला
जोडव्यांचा जोड देतो तुम्हाला
जोडव्यांचा जोड नको मला
मी नाही यायची तुमच्या घराला
यादवराया राणी .......
जाऊ गेली समजावयाला
चला चला जाऊबाई आपुल्या घराला
ब्रेसलेटचा जोड देते तुम्हाला
ब्रेसलेटचा जोड नको मला
मी नाही यायची तुमच्या घराला



श्रीकृष्णा कमलाकांता, असे कसे झाले?
असे कसे झाले? माझ्या नशिबी आले.
♬ ♬ ♬

## २१. चंदनाच्या झाडावरून

चंदनाच्या झाडावरून पडली गं, पडली गं
पाटल्यांचा जोड मोडला गं, मोडला गं
दिल्लीच्या सोनाराला बोलवा गं, बोलवा गं
कंदिल लावून घडवा गं, घडवा गं
कंदिल गेला विझून, विझून
सोनार गेला निजून, निजून ।।१।।
चंदनाच्या झाडावरून पडली गं, पडली गं
कुड्यांचा जोड मोडला गं, मोडला गं
मुंबईच्या सोनाराला बोलवा गं, बोलवा गं
दिवा लावून घडवा गं, घडवा गं
दिवा गेला विझून, विझून
सोनार गेला निजून, निजून ।।२।।
चंदनाच्या झाडावरून पडली गं, पडली गं
तोरड्यांचा जोड मोडला गं, मोडला गं
पुण्याच्या सोनाराला बोलवा गं, बोलवा गं

सुंदर कुड्या
आपण माडीवर
उभं राहू
श्रीकृष्ण देवाची
गंमत पाहू.
♫ ♫ ♫

## २०. श्रीकृष्णा कमलाकांता

श्रीकृष्णा कमलाकांता, असे कसे झाले?
असे कसे झाले? माझ्या नशिबी आले
वेड्याच्या बायकोने लाडू केले
चेंडू चेंडू म्हणून खेळायला घेतले
श्रीकृष्णा कमलाकांता, असे कसे झाले?
असे कसे झाले? माझ्या नशिबी आले
वेड्याच्या बायकोने केल्या होत्या चकल्या
भिंगऱ्या भिंगऱ्या म्हणून त्याने फिरवायला घेतल्या
श्रीकृष्णा कमलाकांता, असे कसे झाले?
असे कसे झाले? माझ्या नशिबी आले
वेड्याच्या बायकोने श्रीखंड केले
चंदन चंदन म्हणून त्याने अंगाला लावले



यादवराया राणी .......
नणंद गेली समजावयाला
चला चला वैनीबाई आपुल्या घराला
तोरड्यांचा जोड देते तुम्हाला
तोरड्यांचा जोड नको मला
मी नाही यायची तुमच्या घराला
यादवराया राणी......
दीर गेले समजावयाला
चला चला वैनीबाई आपुल्या घराला
सोन्याचा गोफ देतो तुम्हाला
सोन्याचा गोफ नको मला
मी नाही यायची तुमच्या घराला
यादवराया राणी......
नवरा गेला समजावयाला
चल चल राणी आपुल्या घराला
अर्धे राज्य देतो तुजला
अर्धे राज्य नको मला
मी तर येते आपल्या घराला
यादवराया राणी हासुनी आली कैसी
सासुरवासी सून घरासी आली ऐसी.
♫ ♫ ♫

## ९. अक्कण माती

अक्कण माती चिक्कण माती, खळगा तो खणावा
असा खळगा सुरेख बाई, जाते ते रोवावे
असे जाते सुरेख बाई, गहू ते दळावे
असे गहू सुरेख बाई, रवा तो काढावा
असा रवा सुरेख बाई, करंज्या कराव्या
अशा करंज्या सुरेख बाई, तबकात ठेवाव्या
असे तबक सुरेख बाई, शेल्याने झाकावे
असा शेला सुरेख बाई, माहेरी धाडावा
असे माहेर सुरेख बाई, खेळाया सापडते
असे सासर द्वाड बाई, कोंडुनी मारिते.

♬ ♬ ♬

## १०. कारल्याचं बी

सोन्याचा करंडा मोत्याचं झाकण
आमच्या सासुबाई कुंकू लावत होत्या
सासुबाई सासुबाई मला मूळ आलं
धाडा मजला माहेरा, माहेरा
कारल्याचं बी पेरगं सुनबाई



हळूच भुलाबाई हात टेकवा
पाटल्या तुमच्या भारी
येथून दाणा पेरत जाऊ
सोनियाच्या दारी
हळूच भुलाबाई डोकं टेकवा
बिंदी तुमची भारी
येथून दाणा पेरत जाऊ
सोनियाच्या दारी
हळूच भुलाबाई मान वाकवा
मंगळसुत्र भारी.

♬ ♬ ♬

## १९. खणखण कुदळी

खणखण कुदळी
मणमण माती
देऊळ खचलं
अर्ध्या राती
देवळात सापडले
माणिकमोती
माणिकमोत्यांच्या

चौक भरला मोत्याचा
मोत्याला आल्या शेंगा
घाल गं पोरी पिंगा
एकीच्या का दोघीच्या
मामाजीच्या लेकीच्या
मामाजीची लेक गोरी
हळद लावा थोडी
हळदीचे उंडे, रेशमाचे गुंडे.
♬ ♬ ♬

## १८. येथून दाणा

येथून दाणा पेरत जाऊ
सोनियाच्या दारी
हळूच भुलाबाई पाय टेकवा
तोरड्या तुमच्या भारी
येथून दाणा पेरत जाऊ
सोनियाच्या दारी
हळूच भुलाबाई कंबर वाकवा
कंबरपट्टा भारी
येथून दाणा पेरत जाऊ
सोनियाच्या दारी



मग जा आपुल्या माहेरा, माहेरा
कारल्याचं बी पेरलं हो सासुबाई
आतातरी धाडा माहेरा, माहेरा
कारल्याचा वेल येऊ दे गं सुनबाई
मग जा आपुल्या माहेरा, माहेरा
कारल्याचा वेल आला हो सासुबाई
आतातरी धाडा माहेरा, माहेरा
कारल्याला फुल येऊ दे गं सुनबाई
मग जा आपुल्या माहेरा, माहेरा
कारल्याला फुल आलं की हो सासुबाई
आता तरी धाडा माहेरा, माहेरा
कारल्याला कारलं येऊ दे गं सुनबाई
मग जा आपुल्या माहेरा, माहेरा
कारल्याला कारलं आलं की हो सासुबाई
आता तरी धाडा माहेरा, माहेरा
कारल्याची भाजी कर गं सुनबाई
मग जा आपुल्या माहेरा
कारल्याची भाजी केली की हो सासुबाई
आता तरी धाडा माहेरा, माहेरा
कारल्याची भाजी खा गं सुनबाई
मग जा आपुल्या माहेरा, माहेरा
कारल्याची भाजी खाल्ली की हो सासुबाई

आता तरी धाडा माहेरा, माहेरा
खरकटी भांडी घास गं सुनबाई
मग जा आपुल्या माहेरा, माहेरा
खरकटी भांडी घासली हो सासुबाई
आता तरी धाडा माहेरा, माहेरा
मला काय पुसतेस? बरीच दिसतेस
पूस आपल्या सासऱ्याला, सासऱ्याला
सोन्याचं दौत बाई मोत्याची लेखणी
तिथं आमचे मामंजी लिहीत होते
मामंजी मामंजी मला मूळ आलं
आता तरी धाडा माहेरा, माहेरा
मला काय पुसतेस? बरीच दिसतेस
पूस जा आपल्या जावेला, जावेला
सोन्याचा डेरा बाई मोत्याची रवी,
तिथं आमच्या जाऊबाई ताक करीत होत्या
जाऊबाई, जाऊबाई मला मूळ आलं
आता तरी धाडा माहेरा, माहेरा
मला काय पुसतेस? बरीच दिसतेस
पूस जा आपल्या दिराला, दिराला
सोन्याची विटी आणि मोत्याचा दांडू
तिथं आमचे भाऊजी खेळत होते



ऊठा ऊठा भुलाबाई, आला तुमचा बाप
अतरंडीवर पतरंडी, पतरंडीवर साय
ऊठा ऊठा भुलाबाई, आली तुमची माय
अतरंडीवर पतरंडी, पतरंडीवर फणी
ऊठा ऊठा भुलाबाई, घाला लवकर वेणी.

♬ ♬ ♬

## १७. पापड भाजिला

पापड भाजिला
चुलीमागे ठेविला
सासूनी तो पाहिला
तिने केला कल्ला
म्हणाला सासरा
चिठ्ठी धाडा माहेरा
रुणझुण गाडी जुतली
त्यात मैना बसली
काऊन मैना कोमावली
रडत माहेरा चालली
कोमावलीचा हात
नागोबाची भेट
असा नागोबा थट्ट्याचा

## १५. हत्तीच्या सोंडेवर

हत्तीच्या सोंडेवर पेरीला मोगरा
एवढुसा पेरीला, नगरवासी गेला
नगरच्या राजाने वाडी मस्त केली
राणी भुलाबाई माडीवरती गेली
माडीच्या फरशीला चिकनचोपडे गोटे
एवढ्या रात्री धुणं कोण धुते?
धुणं धुजो बाई चंदन गोट्यावरी
वाळू घालजो बाई जाई मोगऱ्यावरी
घड्या करजो बाई रंगीन पाटावरी
नेऊन ठेवजो बाई राजाच्या मंदिरी.

♫ ♫ ♫

## १६. अतरंडीवर पतरंडी

अतरंडीवर पतरंडी, पतरंडीवर काळं कुत्रं
ऊठा ऊठा भुलाबाई, घाला आपलं मंगळसुत्र
अतरंडीवर पतरंडी, पतरंडीवर चूल
ऊठा ऊठा भुलाबाई, रडते तुमचं मूल
अतरंडीवर पतरंडी, पतरंडीवर साप



भाऊजी भाऊजी, मला मूळ आलं
आता तरी धाडा माहेरा, माहेरा
मला काय पुसतेस? बरीच दिसतेस
पूस जा आपल्या नणदेला, नणदेला
सोन्याची सुपली बाई मोत्यांनी गुंफली
तिथं आमच्या वन्स पाखडत होत्या
वन्सबाई, वन्सबाई मला मूळ आलं
आता तरी धाडा माहेरा, माहेरा
मला काय पुसतेस? बरीच दिसतेस
पूस जा आपल्या पतीला, पतीला
सोन्याचा पलंग बाई मोत्याचे खूर
तिथं आमचे पती झोपले होते
पतीराज पतीराज मला मूळ आलं
आता तरी धाडा माहेरा, माहेरा
घेतलं लाकूड लावलं पाठी
भुलाबाई विसरल्या माहेरच्या गोष्टी.

♫ ♫ ♫

## ११. झिपरं कुत्रं

झिपरं कुत्रं सोडा गं बाई
चारी दरवाजे लावा गं बाई
कोण पाहुणे आले गं बाई?
सासरा पाहुणा आला गं बाई
सासऱ्यांनी काय आणलं गं बाई?
सासऱ्यांनी आणला कुड्यांचा जोड
कुडयांचा जोड मी घेत नाही
तुमच्याबरोबर येत नाही
झिपरं कुत्रं सोडा गं बाई
चारी दरवाजे लावा गं बाई
कोण पाहुणे आले गं बाई?
सासू पाहुणी आली गं बाई
सासूनी काय आणलं गं बाई?
सासूनी आणला बांगड्यांचा जोड
बांगड्यांचा जोड मी घेत नाही
तुमच्याबरोबर येत नाही
झिपरं कुत्रं सोडा गं बाई
चारी दरवाजे लावा गं बाई
कोण पाहुणे आले गं बाई?
भासरा पाहुणा आला गं बाई



माझ्या गं माहेरच्यांनी दिला मला गडी
असला कसला गडी, त्याची मिजास बडी
तुझ्या गं माहेरच्यांनी काय काय दिलं?
माझ्या गं माहेरच्यांनी दिली मला बाई
असली कसली बाई, तिला रीतच न्हाई.

♬ ♬ ♬

## १४. आड्यावरच्या पाड्यावर

आड्यावरच्या पाड्यावर धोबी धुणं धुतो
भुलाबाईच्या पातळाला लाल रंग देतो
आड्यावरच्या पाड्यावर धोबी धुणं धुतो
भुलाबाईच्या पातळाला हिरवा रंग देतो
आड्यावरच्या पाड्यावर धोबी धुणं धुतो
भुलाबाईच्या पातळाला निळा रंग देतो
आड्यावरच्या पाड्यावर धोबी धुणं धुतो
भुलाबाईच्या पातळाला पिवळा रंग देतो
आड्यावरच्या पाड्यावर धोबी धुणं धुतो
भुलाबाईच्या पातळाला गुलाबी रंग देतो
आड्यावरच्या पाड्यावर धोबी धुणं धुतो
भुलाबाईच्या पातळाला केशरी रंग देतो.

♬ ♬ ♬

हरवला, हरवला
तुमचे काय जाते? माझ्याच बापाने घडवला, घडवला.

♬ ♬ ♬

## १३. तुझ्या गं माहेरच्यांनी

तुझ्या गं माहेरच्यांनी काय काय दिलं?
माझ्या गं माहेरच्यांनी दिल्या मला साखळ्या
असल्या कसल्या साखळ्या बाई, फुलांच्या पाकळ्या
तुझ्या गं माहेरच्यांनी काय काय दिलं?
माझ्या गं माहेरच्यांनी दिल्या मला पाटल्या
असल्या कसल्या पाटल्या बाई, हातात दाटल्या
तुझ्या गं माहेरच्यांनी काय काय दिलं?
माझ्या गं माहेरच्यांनी दिले मला गोट
असले कसले गोट बाई, हत्तीचे रोट
तुझ्या गं माहेरच्यांनी काय काय दिलं?
माझ्या गं माहेरच्यांनी दिली मला बिंदी
असली कसली बिंदी बाई, कपाळाला चिंधी
तुझ्या गं माहेरच्यांनी काय काय दिलं?
माझ्या गं माहेरच्यांनी दिला मला हत्ती
असला कसला हत्ती बाई, उधळतो माती
तुझ्या गं माहेरच्यांनी काय काय दिलं?



भासऱ्यांनी काय आणले गं बाई?
भासऱ्यांनी आणला पाटल्यांचा जोड
पाटल्यांचा जोड मी घेत नाही
तुमच्याबरोबर येत नाही
झिपरं कुत्रं सोडा गं बाई
चारी दरवाजे लावा गं बाई
कोण पाहुणे आले गं बाई?
जाऊ पाहुणी आली गं बाई
जाऊनी काय आणलं गं बाई?
जाऊनी आणला तोरड्यांचा जोड
तोरड्यांचा जोड मी घेत नाही
तुमच्याबरोबर येत नाही
झिपरं कुत्रं सोडा गं बाई
चारी दरवाजे लावा गं बाई
कोण पाहुणे आले गं बाई?
नणंद पाहुणी आली गं बाई
नणदेनी काय आणलं गं बाई?
नणदेनी आणला सोन्याचा गोफ
सोन्याचा गोफ मी घेत नाही
तुमच्याबरोबर येत नाही
झिपरं कुत्रं सोडा गं बाई

चारी दरवाजे लावा गं बाई
कोण पाहुणे आले गं बाई?
पतीराज पाहुणे आले गं बाई
पतीराजांनी काय आणलं गं बाई?
पतीराजांनी आणले मंगळसुत्र
मंगळसुत्र मी घेते
तुमच्याबरोबर येते
झिपरं कुत्रं बांधा गं बाई
चारी दरवाजे उघडा गं बाई.
♫ ♫ ♫

## १२. चांदण्या रात्री

चांदण्या रात्री भुलाबाई जागवल्या
सासू पुसे सुनेला
सुनबाई सुनबाई, कानातला जोड काय केला?
हरवला, हरवला
तुमचे काय जाते? माझ्याच बापाने घडवला, घडवला
चांदण्या रात्री भुलाबाई जागवल्या
सासू पुसे सुनेला



सुनबाई सुनबाई, बांगड्यांचा जोड काय केला?
हरवला, हरवला
तुमचे काय जाते? माझ्याच बापाने घडवला, घडवला
चांदण्या रात्री भुलाबाई जागवल्या
सासू पुसे सुनेला
सुनबाई सुनबाई, तोड्यांचा जोड काय केला?
हरवला, हरवला
तुमचे काय जाते? माझ्याच बापाने घडवला, घडवला
चांदण्या रात्री भुलाबाई जागवल्या
सासू पुसे सुनेला
सुनबाई सुनबाई, जोडव्यांचा जोड काय केला?
हरवला, हरवला
तुमचे काय जाते? माझ्याच बापाने घडवला, घडवला
चांदण्या रात्री भुलाबाई जागवल्या
सासू पुसे सुनेला
सुनबाई सुनबाई, कंबरपट्टा काय केला?
हरवला, हरवला
तुमचे काय जाते? माझ्याच बापाने घडवला, घडवला
चांदण्या रात्री भुलाबाई जागवल्या
सासू पुसे सुनेला
सुनबाई सुनबाई, तोरड्यांचा जोड काय केला?